# भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.
# जि.ठाणे.

## राष्ट्र निर्माण करण्यांत भिवंडीची महत्वाची भुमिका
## राज्यपाल मा.सी.एच.विद्यासागर राव




**भिवंडी महानगरपालिकेने आयोजित केलेल्या महाराष्ट्र स्वच्छता अभियानांतर्गत भिवंडीत मा.राज्यपाल महोदयांना खास निमंत्रण देऊन स्वच्छतेचं महत्व काय? हे भिवंडी शहरातील नागरीकांना देण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांनी मा.आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांच्या विनंतीला मान देत भिवंडीस भेट देत,संपूर्ण स्व.परशुराम टावरे क्रिडा संकूलमध्ये जवळजवळ दहा हजाराच्या आसपास उपस्थित भिवंडीतील नागरीकांना व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचा नारा,संदेश दिला.** देशाच्या विकासांत महाराष्ट्रच नाही तर भिवंडी शहराचाही महत्वाचा वाटा आहे.वस्त्रोद्योगामध्ये भिवंडीचे नांव अग्रेसर असल्याने भारताचे मॅचेस्टर म्हणून भिवंडीची ओळख संपूर्ण जगभरांत आहे.मा.राज्यपाल सी.एच.विद्यासागर राव यांनी पुढे म्हटले की,भारताचे पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोंदींनी स्वच्छ भारत अभियानांतर्गत केलेल्या आवाहनांस आपण उत्तम प्रतिसाद देणे गरजेचे आहे.खुल्यावर शौचास जाणा-यांना यापासून मुक्ती मिळावी यासाठी महानगरपालिकेने शासनाच्या निर्देशनुसार व्यक्तिगत संडास बनविण्यांस नागरीकांना प्रत्येकी १७ हजारांचे अनुदान देऊन उघड्यावरील शौच मुक्त भिवंडी करण्यासाठी यावेळी शौचालय बांधणा-या २१३२ लाभार्थ्यांपैकी १७ लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपंत राज्यपाल महोदयांच्या हस्ते अनुदानाचे धनादेशाचे वाटप केले.

स्वच्छता करणं हे प्रवृती बनणं आवश्यक आहे.मा.प्रंतप्रधान मोदींजींनी स्वच्छतेविषयी केलेल्या आवाहनांस सातत्य रहायला हवे,याही अगोदर महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेसाठी भरीव काम करीत गांवोगांवी स्वच्छतेचा मंत्र दिला आहे.परंतू आपणच आपली स्वच्छता ठेवली नाही.उघड्यावर शौचांस जात राहीलो तर मग शहराची स्वच्छता राहणार कशी? भिवंडी ही मिनी इंडिया आहे,इथं सर्व जाती-धर्माचे लोकं राहतात,सर्वानी मनावर घेतलं तर भिवंडीत होणारा कचरा भरपूर प्रमाणांत कमी होणार आहे.या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा घनकचरा व्यवस्थापन केंद्र सुरु करण्यासाठी माझे प्रयत्न असून त्यासाठी मी लवकरच राजभवनात संबंधितांना बैठक घेणार आहे,याचा फायदा भिवंडी,कल्याण,डोंबिवलीसह सर्वांना होणार आहे,असेही ते म्हणाले.

यावेळी व्यासपिठावर महापौर तुषार चौधरी,ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा.एकनाथजी शिंदे,खासदार कपिल पाटील,आमदार रुपेश म्हात्रे,आमदार महेश चौघुले,शिक्षक आमदार रामनाथ मोते,अपर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आदींची उपस्थिती होती.

## भिवंडी महानगरपालिकातर्फे प्रजासत्ताक दिन साजरा,
## आपले सरकार पोर्टलचे उद्‌घाटन.

देशामध्ये विविध ठिकाणी साजरा केल्या जाणा-या भारताच्या ६६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे मा.महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजास महानगरपालिका

आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांच्या उपस्थितीमध्ये मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीच्या आवारांत मानवंदना देण्यांत आली.

सर्वसामान्य नागरीकांच्या मंत्रालयीन व शहर स्तरावरील तक्रारींचे निवारण करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या आज मंत्रालयीन स्तरावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ मधील अधिसूचित केलेल्या १५ सेवा या प्रथम ६ जिल्ह्यांकरीता तक्रार निवारण प्रणाली सुरु करण्याच्या निर्णयानुसार भिवंडी महानगरपालिकेनेही शासनाच्या आपले सरकार या पोर्टलला महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ शासनाच्याधर्तीवर नागरीकांच्या तक्रारासाठी आजपासून जोडण्यांत आलेले असून,सदर कार्यक्रमाचे उद्घाटन महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीत मा.महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर,पदाधिकारी,नगरसेवक,नगरसेविका यांच्या उपस्थितीत करण्यांत आले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ हे आपले सरकार हे पोर्टलला जोडण्यांत आलेले असून ,विहित मर्यादेत,कालावधीत या सेवा नागरीकांना पुरविणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे,त्याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या आवाहनानुसार आज या प्रणालीचे मा.महापौर साहेबांनी उद्घाटन केले.त्यामुळे आता शहरातील नागरीकांना ऑनलाईन तक्रार करणे व प्राप्त तक्रारींचे ऑनलाईन अधिका-यांनी निवारण करुन देणे आता बंधनकारक झालेले आहे. या प्रणालीचा नागरीकांनी जास्तीत-जास्त उपयोग करुन घ्यावा असे आवाहन आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी उपस्थितांना माहिती देतांना केले.

शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळयास महापौर श्री.तुषार चौधरी,आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर,नगरसेवक श्री.दिलिप गुळवी,इमरान खान यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केले तसेच शहरातील विविध राष्ट्र पुरुषांचे पुतळे,हुतात्मा स्मारक येथे पुष्पहार,पुष्पचक्र सन्मा.पदाधिका-यांच्या हस्ते अर्पण करण्यांत आले.यावेळी नगरसेवक श्री.मदन बुवा नाईक,श्री.प्रशांत लाड,विकास निकम,नोमान भाई,उप-आयुक्त(मुख्यालय) सौ.विजया कंठे,उप-आयुक्त(आरोग्य) श्री.अनिल डोंगरे,शहर अभियंता श्री.अरुण निरभवणे,विनोद शिंगटे,हबीब जमादार,सहाय्यक आयुक्त (प्रशासन) श्री.सुभाष झळके,माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल झळके,डॉ.विद्या शेट्टी,प्रभाग अधिकारी श्री.अशोक लाडकर,सुदाम जाधव व इतर अधिकारी,कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिवंडी महानगरपालिकातर्फे देशातील हुतात्म्यांना आदरांजली.

३० जानेवारी म्हणजे हुतात्मा दिन.देशासाठी ज्यांनी प्राणाची आहूती दिली,सर्वस्व वाहिले आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.अशा हुतात्म्यांना भिवंडी महानगरपालिकेचे मा.महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी,डॉ.विजया कंठे-उपआयुक्त(मुख्यालय),शहर अभियंता श्री.अरुण निरभवणे,सहाय्यक आयुक्त(प्रशासन) श्री.सुभाष झळके यांच्या विशेष उपस्थितीमध्ये दोन मिनिटे मौन पाळून शासन निर्देशानुसार आदरांजली वाहण्यांत आली.

देशातील हुतात्म्यांची एक आठवण व जाणीव यातून हा आजचा हुतात्मा दिनानिमित्त आदरांजलीचा कार्यक्रम भिवंडी निजा.शहर महानगरपालिकेच्यावतीने साजरा करण्यांत आला.याप्रसंगी महापालिका अधिकारी , कर्मचारी वर्ग व महिला कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

January2016

## महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचा-यांची उल्लेखनिय कामगिरी
## - माजी महापौर विलास पाटील.



**भिवंडी महानगरपालिकेने आयोजित केलेल्या महाराष्ट्र स्वच्छता अभियानांतर्गत भिवंडीत मा.राज्यपाल महोदयांना खास निमंत्रण देऊन स्वच्छतेचं महत्व काय? हे भिवंडी शहरातील नागरीकांना देण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांनी मा.आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांच्या विनंतीला मान देत भिवंडीस भेट देत,संपूर्ण स्व.परशुराम टावरे क्रिडा संकूलमध्ये जवळजवळ दहा हजाराच्या आसपास उपस्थित भिवंडीतील नागरीकांना व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचा नारा,संदेश दिला.** देशाच्या विकासांत महाराष्ट्रच नाही तर भिवंडी शहराचाही महत्वाचा वाटा आहे.वस्त्रोद्योगामध्ये भिवंडीचे नांव अग्रेसर असल्याने भारताचे मॅचेस्टर म्हणून भिवंडीची ओळख संपूर्ण जगभरांत आहे.मा.राज्यपाल सी.एच.विद्यासागर राव यांनी पुढे म्हटले की,भारताचे पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोंदींनी स्वच्छ भारत अभियानांतर्गत केलेल्या आवाहनांस आपण

भिवंडी शहरांमध्ये व संपूर्ण महाराष्ट्रांत जेव्हा पूर परिस्थिती निमार्ण झाली तेंव्हा भिवंडी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या सर्व कर्मचा-यांनी भिवंडी शहर संपूर्णपणे स्वच्छ केले,उत्तम पध्दतीने औषधांची फवारणी करीत भिवंडीसह आजूबाजूची गावं,ठाणे-कल्याण महानगरपालिकेचे विभागही साफ करुन दिले,त्यामुळे ते काम करीत नाहीत असा जो सर्वांचा समज झालेला आहे,तो साफ चुकीचा आहे.ते अत्यंत मेहनतीने व जबाबदारीने काम करतात,याची ग्वाही देत त्यांनी भिवंडी स्वच्छता विभागाच्या उल्लेखनिय कामाची प्रशंसा करीत त्यांच्या कामाच्या प्रती ठोस पावतीच सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या सत्कार कार्यक्रमांत बोलताना त्यांनी दिली.यावेळी व्यासपिठावर उप-आयुक्त (मुख्यालय)डॉ.विजया कंठे,शहर अभियंता श्री.अरुण निरभवणे व सहाय्यक आयुक्त (प्रशासन) श्री.सुभाष झळके उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की,मी या आरोग्य विभागाचा सभापती पदावर असतांना हे आरोग्य अधिकारी व कर्मचारी कसे काम करतात,हे जवळून पाहिले असल्याने मी आज ठामपणे त्यांच्याबद्दल सांगतो.आज शहर सफाईबाबत भिवंडीतील मंडळी यांना वाईट बोलतात,ही गोष्ट योग्य नाही.शहर स्वच्छतेसाठी महानगरपालिकेची जबाबदारी जरी असली तरीसुध्दा आपलं शहर,आपला परिसर स्वच्छ कसा राहील,याची राष्ट्रीय जबाबदारी तितकीच येथील नागरीकांची आहे,अशा कामांत त्यांचा सहभाग अत्यंत आवश्यक व प्रभावी ठरणार आहे.शहर स्वच्छता ही आपणांसर्वांचीच जबाबदारी आहे,याची जाणीव आपणांला कायम हवी ,असे ते शेवटी म्हणाले.

यावेळी उपस्थित उप-आयुक्त(मुख्यालय)सौ.विजया कंठे यांनी आपल्या भाषणांत सांगितले की,मागच्या महिन्यांतच मा.आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे १ कोटीची रक्कम सेवानिवृत्त कर्मचा-यांना अदा करण्यांत आलेली आहे,यापुढेही अशा रक्कमांचे धनादेश अशा कार्यक्रमातूनच अधिकरी,कर्मचा-यांना देण्यांचा महानगरपालिकेचा प्रयत्न राहणार आहे.याप्रसंगी सहाय्यक आयुक्त(प्रशासन) श्री.सुभाष झळके,महेंद्र सोनावणे यांची भाषणे झाली.कार्यक्रमाचे संचलन माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल झळके यांनी केले.

नियत वयोमानानुसार श्री.जावेद सिकंदर खतीब(आरोग्य निरिक्षक),श्री.दत्तू बाबू दिमदिमे (जकात हमाल),श्रीमती.मलिका दौलत हु.मोमीन(बालवाडी मदतनीस),श्रीमती छाया तानाजी धंदुरे(बालवाडी मदतनीस) व श्रीमती नियाजबी खान(शिपाई) या सेवानिवृत्त कर्मचा-यांना महानगरपालिकेतर्फे शाल,बुके व भविष्य निर्वाह निधीचा धनादेश उपस्थित मान्यवरांच्याहस्ते देण्यांत आला.सेवा निवृत्त कर्मचा-यांना निरोप देण्यासाठी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

January2016